16 APR 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बाबासाहेब आंबेडकर भारतीय विकासनीतीचे धोरणकर्ते

## शिवाजी विद्यापीठातील परिसंवादात उमटला सूर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने भारतीय विकासनीतीचे धोरणकर्ते होते, असा सूर सोमवारी शिवाजी विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहानिमित्त आयोजित परिसंवादात उमटला.

यावेळी डॉ. प्रकाश कांबळे यांच्या 'वर्तमान उपयुक्त अर्थशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या पुस्तकावर त्यांच्या उपस्थितीत विशेष परिसंवाद रंगला. यात ज्येष्ठ विचारवंत डॉ. गिरीश मोरे आणि सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राचे सहायक संचालक अविनाश भाले यांनी भाग घेतला. त्यांनी डॉ. आंबेडकर यांना भारतीय विकासनीतीचे खरे शिल्पकार म्हणून अधोरेखित केले. मानव्यशास्त्र विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख अध्यक्षस्थानी होते.

> डॉ. आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचे सर्वसामान्यांना समजेल, अशा भाषेत सादरीकरण हे ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे.

आत्मनिर्भरतेवर आधारित अर्थनीती ही आंबेडकरांच्या विचारांची प्रमुख वैशिष्ट्ये असल्याचे सांगत, डॉ. मोरे यांनी देशाच्या संसाधनांचा योग्य वापर करून स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था उभी करणे हे त्यांचे ध्येय होते, असे सांगितले.

अविनाश भाले म्हणाले, डॉ. आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचे इतक्या सोप्या आणि सर्वसामान्यांना समजेल, अशा भाषेत केलेले सादरीकरण हे या ग्रंथाचे मोठे वैशिष्ट्य आहे. डॉ. कांबळे म्हणाले, डॉ. आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वातील अर्थशास्त्रज्ञ हा महत्त्वाचा पैलू समाज आणि अभ्यासकांकडून मोठ्या प्रमाणावर दुर्लक्षित राहिला आहे. डॉ. देशमुख म्हणाले, डॉ. आंबेडकर यांच्या अर्थशास्त्रीय विचारांची सुस्पष्ट, संक्षिप्त आणि संदर्भाधारित मांडणी हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे. आंबेडकरांचे आर्थिक चिंतन आजच्या काळातही अत्यंत उपयुक्त ठरते. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी प्रास्ताविक केले. सिद्धांत माने यांनी सूत्रसंचालन केले.

16 APR 2026
पुढारी

# वचन साहित्याला अनुभवजन्य परंपरेची जोड : प्राचार्य पाटील

## बसव व्याख्यानमाला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

वचन परंपरा ही ज्ञान परंपरा म्हणून अनेक वर्षांपासून प्रचलित आहे. भारतीय ज्ञान परंपरेत अनुभवजन्य परंपरेची जोड या वचन साहित्याला दिली आहे त्यामुळे बसव तत्त्वज्ञानाचे सार या साहित्यात आहे, असे प्रतिपादन बसव साहित्याचे अभ्यासक प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, शरण साहित्य अध्यासन व बसव केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा बसवण्णा यांच्या जयंतीनिमित्त बसव व्याख्यानमालेस बुधवार (दि. १५) पासून प्रारंभ झाला. या व्याख्यानमालेत' वचन साहित्य एक समृद्ध भारतीय ज्ञान परंपरा' या विषयावर पहिले पुष्प गुंफताना प्रा. डॉ. पाटील बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दत्ता पाटील होते.



डॉ. पाटील म्हणाले, भारतीय ज्ञान परंपरेत अनुभवजन्य व अध्ययनजन्य परंपरांचा समावेश होतो. अनुभवातून मिळणारे ज्ञान हे दीर्घकालीन असते. म्हणूनच अभ्यासकांनी या वचन साहित्यातील अनुभवसंपन्न विचारांना महत्त्व दिले आहे. शरण साहित्य अध्यासनाच्या समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. यावेळी सुरेश जांबुरे, प्रभाकर कुलगुडे, बसव केंद्राचे विश्वस्त राजशेखर तंबाके, सरला पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

16 APR 2026

लोकमत


# वचन साहित्य अनुभवावर आधारलेली चळवळ

## जे. एस. पाटील : बसव व्याख्यानमालेस प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारतीय संस्कृती अनुभवजन्य व अध्ययजन्य ज्ञानपरंपरेत विभागली असून, शेकडो वर्षांपासूनचे वचन साहित्य हे अध्ययजन्य ज्ञानपरंपरा समृद्ध करणारे असून, वचन साहित्याने खऱ्या अर्थाने अनुभवावर आधारलेली चळवळ उभी केली, असे प्रतिपादन विजापूर येथील प्राचार्य डॉ. जे. एस. पाटील यांनी बुधवारी केले.

शिवाजी विद्यापीठाचे शरण साहित्य अध्यासन व बसव केंद्राने शाहू स्मारक भवनात आयोजिलेल्या बसव व्याख्यानमालेचे पहिले पुष्प डॉ. पाटील यांनी गुंफले. 'वचन साहित्य एक समृद्ध ज्ञान परंपरा' या विषयावर त्यांनी मांडणी केली. प्राचार्य डॉ. दत्तात्रय पाटील अध्यक्षस्थानी होते.



जे. एस. पाटील म्हणाले, शेकडो वर्षांपासून वचन साहित्य हे विद्रोही साहित्य आहे असेच मानले गेले. मात्र, वचन साहित्य हे अनुभवातून आलेले आहे. आपल्या कृषी परंपरा, आर्थिक विषमता यावर अनुभवाद्वारे महात्मा बसवेश्वर यांनी वेगळ्या पद्धतीची मांडणी केली आहे. प्रत्येकाने कष्ट करावे, जितके हवे तितकेच स्वतःकडे ठेवावी. उरलेले समाजाला द्यावे, हे तत्त्व महात्मा बसवेश्वर यांनी मांडले. यातून समाजातील आर्थिक विषमता दूर करून समानता आणण्याचा त्यांचा प्रयत्न होता. शेकडो वर्षांपूर्वी त्यांनी मांडलेले हे तत्त्व आर्थिक समानतेसाठी उपयोगी ठरले.

दत्तात्रय पाटील यांनीही वचन साहित्याची मांडणी केली. प्रा.डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक केले. ॲड. अंकिता त्रिभुवने यांनी सूत्रसंचालन केले. बाबूराव तारळी यांनी आभार मानले. सुरेश जांबुरे, प्रभाकर कुलगुडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

### आजचे व्याख्यान

वक्ते : इंद्रजित देशमुख
विषय : अमृतानुभवातील चिंतन
अध्यक्ष : प्राचार्य डॉ. जी. पी. माळी

1 6 APR 2026

सकाळ

# विद्यापीठातील एम. ए. योगशास्त्रची शुल्कवाढ रद्द

**कोल्हापूर :** अभ्यासक्रम सुरू होऊन दहा महिन्यांचा कालावधी झाल्यानंतर केलेली एम. ए. योगशास्त्र (भाग एक) अभ्यासक्रमाची शुल्कवाढ रद्द करण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने आज घेतला. विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत एम. ए. योगशास्त्र अभ्यासक्रम राबविला जात आहे. या अभ्यासक्रम भाग एकच्या विद्यार्थ्यांना तोंडी सूचना करून विभागाने आठ हजार रुपये इतकी शुल्कवाढ केली. अभ्यासक्रम सुरु होवून दहा महिन्यांपेक्षा जादा कालावधी झाला आहे. त्यामुळे शुल्कवाढ विद्यार्थ्यांवर अन्यायकारक आहे. ती रद्द करून विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी प्रवेशपत्र त्वरित देण्यात यावी, अशी मागणी व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. स्वागत परुळेकर यांनी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याकडे केली. या पत्राच्या अनुषंगाने आज व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. त्यात यंदाच्या वर्षापुरती शुल्कवाढ रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.

16 APR 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वचन साहित्यातील विचारांतून समानतेचा संदेश

## प्राचार्य जे. एस. पाटील : बसव व्याख्यानमालेस सुरुवात

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १५ : महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्यातील विचार हे समानतेचा संदेश देणारे आहेत. तो मानवी जगण्याशी निगडित अनुभवाधारित सिद्धांत आहे. तो समजून घेऊन आचरणात आणणे काळाची गरज आहे, असे मत प्राचार्य जे. एस. पाटील यांनी आज येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ शरण साहित्य अध्यासन व बसव केंद्र यांच्यातर्फे महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त बसव व्याख्यानमालेस येथे सुरुवात झाली, यावेळी 'वचन साहित्य एक समृद्ध भारतीय ज्ञान परंपरा' या विषयावर ते बोलत होते. प्राचार्य दत्ता पाटील अध्यक्षस्थानी होते.

डॉ. पाटील म्हणाले, 'भारतीय ज्ञान परंपरेत अध्ययनजन्य ज्ञान परंपरा व अनुभवजन्य ज्ञान परंपरा आहेत. यात बसवण्णाची वचन परंपराही अनुभवजन्य आहे. बसवण्णाची वचने अनुभव साहित्य मानले जाते. बहुजनांतून आलेले अनुभव संचित आहे. अशा अनुभवांच्या ज्ञान परंपरेला एका चौकटीत बांधणे अशक्य आहे. तरीही आजच्या काळात भारतीय ज्ञान परंपरा एकाच चौकटीत बांधण्याचा टोकाचा प्रयत्न होत आहे. पावसाळ्यात शेतीत ते बियाणे कसे, कधी व किती पेरायचे, ही कला आहे. ती अनुभवावर आधारित आहेत. म्हणूनही अनुभव परंपरेत शेतीचे ज्ञान आहे.

शेती पिकविल्याने अन्नधान्य मिळते, जगण्याला आधार लाभतो. याउलट अध्ययन परंपरेत एखाद्या ठिकाणी बसून विचार करून जे साहित्य लिहिले जाते त्यातील ज्ञान ते वास्तविक जीवनाशी तितकेसे सुसंगत असेलच असे नाही. त्यामुळे अनुभव साहित्यातील ज्ञान लोकांनी स्वीकारले आहे. अशा बसवण्णांच्या वचनावर अनुभव मंडपात चर्चा होत होती.'




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ शरण साहित्य अध्यासन व बसव केंद्रातर्फे बसव व्याख्यानमालेस बुधवारी सुरुवात झाली. यावेळी बोलताना डॉ. जे. एस. पाटील. शेजारी प्रा. तृप्ती करेकट्टी, दत्ता पाटील, सुरेश जांबुटे, प्रभाकर कलगुडे.

### आजचे व्याख्यान

- वक्ते - इंद्रजित देशमुख
- विषय - 'अमृतानुभवातील चिंतन'
- स्थळ व वेळ - शाहू स्मारक भवन, सायंकाळी सहा वाजता